मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक ३ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • मार्च - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक ३ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • मार्च २०१८


संपादक
राजेंद्र थोरात

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन, दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org





| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## कथा


- माता सीतेची जन्मकथा ०६
- खरा रसिक ०८
- कोल्ह्याची फजिती १४
- विद्येची रेषा ३५
- गाठोडे कुणाचे ४२
- वटवृक्षाची शिकवण ४८




## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०





## विशेष व प्रेरक प्रसंग



- देश घडविणारा शास्त्रज्ञ ०५
- तेजस्विनी -७१ २०
- गौताळा अभयारण्य २१
- दुर्गभ्रमंती २२
- व्यक्तिविशेष २९
- शिमगा ३१
- समर्थ दर्शन -४१ ३४
- आपले जिल्हे ४४
- पक्षीजगत ४७





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६


## कविता


- आंतरराष्ट्रीय महिला दिवस ०७
- करु नका विश्राम १५
- मला वाचवा ४९

# एकरस अवस्था

मित्रांनो, सद्‌गुरु बाबाजी एकदा आपल्या प्रवचनात म्हणाले, की 'जीवन असं जगा, जसं रंगमंचावर अभिनय करत आहात आणि अभिनय असा करा, जणू वास्तव जीवन जगत आहात.' याचा अर्थ असा आहे - जीवनात अनेक घडामोडी घडत असतात. यश-अपयश येतच असतं. त्याचा मनावर विपरीत परिणाम होऊ नये. अपयशाने खचून जाऊ नये आणि यशाने उन्मत्त होऊ नये. जीवनामध्ये आपापली भूमिका अतिशय प्रामाणिकपणे वठवावी. याचा अर्थ असा मुळीच होत नाही, की आपण वरवर नम्रतेचा भाव आणायचा पण अंतःकरणात मात्र दुष्टपणा जपून ठेवायचा; अध्यात्मात अशा गोष्टीला थारा नसतो. भक्ताची अंतर्बाह्य अवस्था सम-समान असावी लागते. याबाबत सद्‌गुरु माताजींनी सुंदर उदाहरणाने समजावले आहे.

दोन दुकानदार असतात. एका दुकानदाराने आपल्या दुकानात खूप उत्तम दर्जाचा व टिकाऊ माल भरलेला असतो; परंतु त्याच्या दुकानाकडे जाणारा रस्ता मात्र खूप खराब असतो. तो काटे-कुटे, खाच-खळगे व सांडपाण्याने भरलेला असतो. त्यामुळे भलेही दुकानात चांगला माल भरलेला असला तरी ग्राहक तिकडे फिरकणार नाहीत. दुसऱ्या दुकानदाराने आपल्या दुकानात हलक्या प्रतीचा व निकृष्ट दर्जाचा माल भरलेला आहे. दुकानाची चांगली सजावट आहे, रस्ताही आकर्षक बनवलेला आहे. पण असे असूनही ग्राहक त्या दुकानाकडे जाणार नाहीत. म्हणून इथे दोन गोष्टी प्रामुख्याने महत्त्वाच्या ठरतात. एक म्हणजे मालही उत्तम दर्जाचा पाहिजे आणि त्या दुकानाकडे जाणारा रस्ताही चांगला असावा.

अगदी याच प्रकारे आपल्या जीवनाच्या बाबतीतही हेच आवश्यक आहे. आपल्यात भलेही खूप सद्‌गुण असतील पण आपलं इतरांशी वागणं, बोलणं जर योग्य नसेल तर त्या गुणांचा काहीच उपयोग होणार नाही. म्हणून आंतरिक सद्‌गुणांबरोबरच इतरांशी आपले व्यवहार चांगले असावेत. वागण्या-बोलण्यात विनम्रता व प्रेम असावे. अशा एकरस अवस्थेत राहण्यासाठी एकरस असणाऱ्या या प्रभु-परमात्म्याशी आपण जोडून राहायला हवे, नाही का?

- राजेंद्र थोरात

# देश घडविणारा शास्त्रज्ञ

## वसंतराव गोवारीकर

अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाची क्षमता विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांची मोठी परंपरा भारताला लाभली आहे. डॉ. होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई, सतीश धवन या शास्त्रज्ञांनी समृध्द केलेली परंपरा तितक्याच समर्थपणे पुढे नेणारे **वसंतराव गोवारीकर** हे देश घडविणारे शास्त्रज्ञ होते. त्यांनी कारकिर्दीला सुरुवात केली तो काळच मुळी देश उभारणीचा होता. स्वातंत्र्यानंतरची पहिली पिढी त्यासाठी धडपडत होती. विज्ञानाची दृष्टी असलेले पंडित नेहरु पंतप्रधान होते. त्यांच्या प्रोत्साहानाने डॉ. भाभा, डॉ. साराभाई यांनी पाया उभारण्यास सुरुवात केली होती. आपल्या कामाला उपयोगी पडतील अशा तरुणांचा शोध घेऊन चमू तयार करीत होते. ब्रिटनमध्ये जाऊन केमिकल इंजिनीअरिंगमधील पदवी घेतलेले आणि ब्रिटीश तसेच अमेरिकी अणुऊर्जा संशोधन संस्थेत संशोधक म्हणून काम केलेल्या गोवारीकरांना साराभाईंनी हेरले. मायदेशी परतून गोवारीकर यांनी थेट केरळ गाठले. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) थुंबा येथील प्रयोगशाळेत प्रोपेलंट इंजिनीअर म्हणून दाखल झाले. गोवारीकर दाखल होण्याच्या दोन-तीन वर्षे आधीच इस्त्रोने अग्निबाणाची चाचणी यशस्वी केली होती आणि उपग्रह प्रक्षेपणासाठी प्रयोग सुरु झाले होते. या प्रक्षेपणाची गरज असते, ती प्रोपेलंट म्हणजेच प्रणोदकाची-इंधनाची. डॉ. गोवारीकर यांचे कार्यक्षेत्रही तेच होते. भारतासारखा नुकताच स्वतंत्र झालेला आणि बहुतांश गरीब लोकांचा असलेला देश अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रयोग करतो आहे, ही बाब त्यावेळच्या जगाला पचनी पडणारी नव्हती. अणुऊर्जा आणि अवकाश संशोधन ही दोन्ही क्षेत्रे महत्त्वाची असल्याने त्यासाठीचे तंत्रज्ञानही प्रगत देश भारताला द्यायला नकार देत होते. या नकाराचे रुपांतर आव्हानात करुन त्यावर मात करण्याची जिद्द भारतीय शास्त्रज्ञांनी बाळगली आणि त्यात गोवारीकर अग्रेसर होते. घनरुप इंधनाबाबतचे त्यांचे प्रयोग यशस्वी झाले. याच काळात त्यांच्यातील नेतृत्वगुणही विकसित होत गेले. विक्रम साराभाई यांनी अवकाश संशोधन केंद्राची धुरा यशस्वीपणे सांभाळून त्यांनी आपल्यातील नेतृत्व सिध्दही केले.

हवामानातील कोणकोणत्या घटकांवर त्याचा हा लहरीपणा अवलंबून आहे, याचा वेध घेऊन त्याबाबतचे निकष तयार करुन मान्सूनचा नेमका अंदाज वर्तविण्यासाठीचे मॉडेल गोवारीकरांच्या नेतृत्वाखालील हवामानशास्त्रज्ञांनी तयार केले. सोळा निकषांचे हे मॉडेल म्हणून प्रसिध्द झाले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनही गोवारीकर यांनी आपली वेगळी मुद्रा निर्माण केली.

कुलगुरु आणि विद्यार्थी यांच्यातील दरी दूर करण्याचाही प्रयत्न केला. विज्ञानाच्या विविध क्षेत्रांत लीलया वावरणारे गोवारीकर यांनी केंद्र आणि राज्य सरकारांच्या विविध समित्यांवर; तसेच विविध संस्थांवर काम करताना दूरदृष्टीचे धोरण ठेवले. त्यांचे हे सारे काम देश घडविण्यासाठीचेच होते.

पौराणिक कथा

# माता सीतेची जन्मकथा

हिमालयातील वनात रावणाने एक तपस्विनी कन्या पाहिली. तिने अंगावर काळ्या रंगाचे मृगचर्म व शिरावर जटा धारण केल्या होत्या. देवांगनेसारखी ती तपस्विनी पाहिल्यावर मोहीत होऊन रावणाने तिला विचारले, "भद्रे, तू आपल्या या अशा युवावस्थेस विसंगत असं तपाचरण का बरे करीत आहेस? तू कुणाची कन्या आहेस?" त्यावर ती तपोधन कन्या म्हणाली, "बृहस्पतीचे पुत्र कुशध्वज यांची मी कन्या. माझे नाव वेदवती. जेव्हा मी तरुण झाले, तेव्हा देव, गंधर्व, यक्ष, राक्षस, किन्नर साऱ्यांनीच माझ्या पित्याकडे मला मागणी घालण्यास सुरुवात केली, परंतु भगवान श्रीविष्णू आपले जावई व्हावेत, ही माझ्या पित्याची इच्छा होती. हे कळल्यावर, दैत्यराज शंभू माझ्या पित्यावर संतापले आणि त्यांनी माझ्या पित्याची हत्या केली. त्यामुळे माझी माता फार दु:खी झाली व ती माझ्या पित्याबरोबरच चितेत अग्निप्रवेश करुन सती गेली."

"म्हणून मी माझ्या मृत पित्याचे मनोरथ सफल करण्यासाठी कठोर व्रत धारण करुन तपश्चर्या करत आहे. भगवान श्रीविष्णूंना पती म्हणून मिळवण्याची माझी प्रतिज्ञा आहे." अभिमानी रावण त्यावर म्हणाला, "सुश्रोणी, तू गर्विष्ठ दिसतेस. म्हणूनच तुझी बुध्दी अशी झाली. तप, पुण्यसंग्रह या वृध्द स्त्रियांनी करावयाच्या गोष्टी. तू तर अलौकिक सुंदर रुपवती आहेस. तुझं तारुण्य वाया जात आहे. मी लंकेचा राजा आहे. तू माझी पत्नी हो, उत्तम सुख, भोग प्राप्त करुन घे. तू ज्याला विष्णू म्हणतेस तो कोण? तप, पराक्रम, व्रत, वैभव यात तो माझी बरोबरी करु शकणार नाही." त्यावर वेदवती म्हणाली, "नीच राक्षसा, तू माझ्या स्त्रीत्वाची विटंबना केली आहेस म्हणून तुझ्या दृष्टीसमोर मी अग्नीत प्रवेश करीन आणि तुझ्या वधासाठी पुनर्जन्म घेईन. अयोनिजा कन्येच्या रुपात मी प्रकट होईन व एका धर्मात्मा पित्याची कन्या होईन." असे म्हणून वेदवतीने प्रज्वलित अग्नीत प्रवेश केला. त्याबरोबर फुलांचा वर्षाव झाला आणि तिथेच दुसऱ्या जन्मातली बालिका कमल फुलातून प्रकटली. कमलाप्रमाणेच ती सुकुमार, टवटवीत व सुंदर बाळसेदार होती. रावणाने ती कन्या घरी नेली व आपल्या मंत्र्यांना दाखविली, परंतु त्यातील एक मंत्री बालबालिकांची लक्षणे जाणणारा होता. तो म्हणाला,

"राजन, या कन्येची लक्षणं काही वेगळी दिसतात. ही घरात राहिली तर ती तुमच्या मृत्यूला कारण ठरेल." हे ऐकून रावणाने तिला लांब समुद्रात पेटीत घालून फेकून दिले. समुद्रजलातून ती जनकाच्या यज्ञपरिसरात पोहोचली. नंतर भूमिकन्या म्हणून जनकाच्या हाती लागली.

अगस्त्य ऋषी श्रीरामांना उद्देशून पुढे म्हणाले, "प्रभो, आजची आपली सुलक्षणी पत्नी व जनककन्या सीता म्हणजेच पूर्वजन्मीची वेदवती होय!"

❍ क्रमशः




विश्वाला घडविणारी,
ही आहे एकच नारी ।।धृ।।

हिंदू, मुस्लिम, सिख, इसाई, पंजाबी गुजराथी
इटालियन, अमेरिकन, हे सर्व देशवासी
जन्म घेतला सर्वांनी, तो मातेच्या उदरी ।।१।।

कुणी राजा, महाराजा, नेपोलियन, सिकंदर
श्रीमंत कुणी बलवंत, पैदास अशी ही अनंत
ऋषी मुनी कुणी संत, शूर वीर आणि महंत
यांना कडेवरी घेणारी ।।२।।

आई बहीण पत्नी, वहिनी, मावशी आते
देऊन प्रेम अनेकांना , जोडून ठेविले नाते
मायेने कवटाळणारी ।।३।।

पुरुषत्व गाजवू नका, सत्याला लाजवू नका
नारी रक्षण करण्या, मागे कुणीही राहू नका
हालवी पाळणा विश्वाचा, धरोनी हाती दोरी ।।४।।

कविता : सुरेश तिर्लोटकर




कथा

# खरा रसिक

शिवरायांच्या काळातली ही घटना आहे. उत्तरेकडे सोळंकी नावाचा एक राजा होता. तो कलाप्रेमी असल्याने त्याच्या दरबारात अनेक गायक, वादक, चित्रकार, कवी येत आणि राजाला आपल्या कलेने खूश करुन बिदागी घेऊन जात. राजा जेवढा रसिक तेवढा अहंकारी देखील होता.

एकदा सुप्रसिध्द कवी भूषण याने त्याला आपल्या काही कविता ऐकवल्या. कविता ऐकून राजा खूश झाला. त्याने कवी भूषणला बिदागी म्हणून दीड हजार सुवर्णाची नाणी दिली. ती देताना तो म्हणाला, "कविराज, आजपर्यंत अनेकांनी तुम्हाला बिदागी दिली असेल; परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणावर बक्षिसी देणारा राजा तुम्हाला प्रथमच भेटला असेल."

कवी भूषण हे लोभी नव्हते. बक्षिसाच्या

लालसेने त्यांनी कधी काव्यगायन केले नाही. ते राजाला म्हणाले, “महाराज, जग फार मोठं आहे. कुणी सांगावं, आपल्यापेक्षाही दानशूर आणि रसिक राजे या पृथ्वीच्या पाठीवर असू शकतील.”

राजाला कवींचे बोलणे आवडले नाही. राजा रागानेच म्हणाला, “कविराज, एवढी बिदागी देणारा राजा तुम्हाला कुठेच भेटणार नाही हे लक्षात ठेवा.” त्यावर कवी भूषण तडफदारपणे म्हणाले, “तर मग महाराज, एवढी दक्षिणा नाकारणारा कवीही तुम्हाला पुन्हा कधी भेटणार नाही.” एवढे बोलून त्यांनी दीड हजार सुवर्ण नाण्यांनी भरलेली ताटं राजाला परत केली आणि ते निघून गेले.

मजल-दरमजल करत कवी भूषण महाराष्ट्रात आले. शिवरायांची कीर्ती ते ऐकून होते. त्यांच्या यशोगाथेचं वर्णन त्यांनी कवितेतून केलं होतं. त्यांची प्रतिभाशक्ती असामान्य होती. त्यांच्या कविता ऐकून शिवराय भारावून गेले. शिवरायांनी त्यांना जे द्रव्य दिले ते नेण्यासाठी कवी भूषण यांना बरोबर घोडे आणि उंट न्यावे लागले.

शिवराय खरे कलाप्रेमी आणि रसिक होते. कलाकारांच्या कलेला ते मनापासून दाद देत, आपल्या उदारपणाचे त्यांनी कधीही प्रदर्शन केले नाही.

❐❐❐

# अशी झाली कागदी नोटांची सुरुवात



आज आपल्याकडे एक रुपयापासून दोन हजार रुपयापर्यंतच्या कागदी नोटा आहेत. पूर्वीच्या काळी फक्त धातूंची नाणी चलनाच्या रुपात प्रचलित होती. आता कागदाच्या नोटांचा इतिहास पाहूया.

इंग्लंडमध्ये एक गरीब कुटुंब राहत होते. त्या कुटुंबातील एका मुलाचे नाव थॉमस होते. त्याच्या वडिलांनी त्याला एका छापखान्यामध्ये नोकरीला लावले. थॉमस छापखान्यामध्ये स्वच्छता करणे, पाणी भरुन ठेवणे इ. कामे करीत असे. काही काळानंतर तो कंपोझिंग आणि छपाईवर जास्त लक्ष देऊ लागला.

काही काळानंतर थॉमसच्या मालकाने त्याला प्रेसमधून काढून टाकले. थॉमसला खूप वाईट वाटले. त्याच्यावर घरातल्या अनेक जबाबदाऱ्या होत्या. त्यामुळे त्याने कचऱ्यातून वस्तू वेचून त्या विकायला सुरुवात केली.


एके दिवशी त्याची ओळख प्रसिध्द चित्रकार रिचर्डशी झाली. बोलता-बोलता थॉमसने रिचर्डला सांगितले, की मी एक हुशार प्रिंटर आहे. मला एक प्रिंटींग प्रेस उभी करायची आहे परंतु माझ्याकडे पुरेसा पैसा नाही. रिचर्डला त्याची दया आली. त्याचा नाव व पत्ता लिहून घेतल्यानंतर काही दिवसांनी त्याला बोलावून एक प्रस्ताव त्याच्यासमोर ठेवला. मला प्रिंटींग प्रेस सुरु करायची आहे. तुला काहीही मोबदला न देता माझा सहकारी म्हणून काम करशील का? थॉमस तयार झाला. त्याने प्रेस चालवायला सुरुवात केली. त्याला अनेक चांगली पुस्तके छापण्याच्या ऑर्डर्स मिळू लागल्या. त्याने छापलेल्या खेळण्याच्या पत्त्याला बरीच प्रसिध्दी मिळाली.

त्याने सरकारला मुद्रा म्हणून नाण्याऐवजी कागदी नोटा वापरायला सांगितल्या. या मुद्यावर बरेच वाद झाले आणि शेवटी थॉमसने सन १३६४ मध्ये नोटा छापल्या. अशाप्रकारे इंग्लंड या देशाने पहिली कागदाची नोट चलनात आणली.

❐❐❐

# शब्दकोडे १६४

❍ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)




## आडवे शब्द

१. लाल रंगाची एक डाळ
४. ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू : ........... जाधव
६. भाज्य भागिले ........... बरोबर भागाकार
८. अमृत या शब्दाचा विरुध्दार्थी
९. छत्तीसगड राज्य आधी ......... प्रदेश या राज्याचा हिस्सा होता.
११. यमुना नदीची उप नदी (चंबळ/ कावेरी)
१२. सर्व प्राण्यांमध्ये सर्वाधिक वेगाने धावणारा प्राणी
१३. देवतांचा राजा
१५. महात्मा गांधीजींचे (फक्त) नाव
१८. स्वतंत्र भारताचे पहिले गर्व्हनर ....... लॉर्ड माउंटबेटन होते.
२०. डोळ्यात घालण्यासाठी वापरतात.

## उभे शब्द

२. द इंडियन स्ट्रगल पुस्तकाचे लेखक : ........ बोस
३. मातीचा किंवा धुळीचा कण
५. यशवंत जयसिंगराव घाटगे हे राजर्षी ....... महाराजांचे पूर्ण नाव आहे.
७. चिखलात उगवणारे एक फूल
१०. जागतिक रंगमंच दिवस मार्च महिन्याच्या ...... तारखेला साजरा करतात.
१३. यांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले.
१४. पंचेद्रियांपैकी सत्संगात कोणतं इंद्रियं सर्वाधिक जागृत असावे ?
१५. भारताचा राष्ट्रीय पक्षी
१६. वजनदार याच्या विरुध्द
१७. कोकणातील एक बंदर येथे वीज प्रकल्प आहे.
१९. एक अंकी सर्वात मोठी संख्या

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारू या

प्रश्न : परमात्मा जे करतो ते योग्यच करतो हे बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी कोणत्या उदाहरणाद्वारे स्पष्ट केले आहे ?

उत्तर : एक माणूस बोरीच्या झाडाखाली विश्रांतीसाठी झोपला होता. त्यांच्या मनात असे विचार आले, की परमात्मासुध्दा एक अजिबच आहे; एवढ्या मोठ्या झाडाला छोटी छोटी फळं आणि एक बारीकशा वेलीवर मोठ मोठे कलिगंड लागतात. इतक्यात त्याच्या नाकावर एक पिकलेले बोर पडते. त्यावेळी त्याला लगेच समजते, की या जागी कलिंगड असते तर काय झाले असते. मग त्याला विचार सुचतो, की परमात्मा जे करतो तेच योग्य आहे.

प्रश्न : तन, मन, धनाच्या सेवेमध्ये कोणती सेवा महान असते ?

उत्तर : सेवा, सेवा असते. त्यामध्ये कोणती महान आणि कोणती लहान, कोणती चांगली किंवा कोणती वाईट हा भेदभावच नसतो. मात्र ती समयानुकूल, निष्काम, कर्ताभावरहित करायला हवी म्हणजे अशाप्रकारे केलेली कोणतीही सेवा महान आहे.

प्रश्न : सर्व समस्यांचे मूळ मन आहे हे कसे काय ? आणि त्याला कसे ताब्यात ठेवता येईल ?

उत्तर : एकंदरीत सर्व समस्यांचे मूळ हे मनच आहे. मन हे माकडासारखे चंचल आहे. ते इकडून तिकडे आणि तिकडून इकडे उड्या मारत चेष्टा करीत राहते. यासाठी त्याला एक दोरखंड बांधून एका खांबाला बांधून ठेवणे हाच पर्याय आहे. त्याचप्रमाणे मनाला ज्ञानरुपी खांबाला नामस्मरणरुपी दोरीने बांधले म्हणजे मन कुठेही जाणार नाही. जसं एका अभंगात म्हटलं आहे -

**आता कोठे धावे मन। तुझे चरण देखलिया।**

प्रश्न : ईश्वर सर्वव्यापी असूनही लोक फक्त मूर्तीतच देव पाहतात. मग तो दगडात नाही आहे का ?

उत्तर : ईश्वर जर सर्वव्यापी आहे तर तो मूर्तीतही आहे, दगडातही आहे. किंबहुना प्रत्येक वस्तूमध्ये आणि बाहेरही आहे. सारे विश्व ईश्वरापासून बनलेले आहे. परंतु केवळ मूर्ती किंवा दगड म्हणजे देव नव्हे. जसे शरीराच्या प्रत्येक अवयवात चेतना आहे. तिथे स्पर्श जाणवतो; परंतु केवळ हात किंवा पाय म्हणजे शरीर नाही. तसा ईश्वर एका विशिष्ट जागेत सीमित नाही; तर सर्वव्यापी आहे.

❑❑❑



# सद्गुरु वचनामृत

## भक्तीचा पैलू - शहाणपण

जर आपल्याला चांगला माणूस बनायचं आहे तर ते स्वत:साठी बनायचं आहे. **Be a better you for you** जगाच्या कुठल्याही काना-कोपऱ्यात असलो तरी नेहमी शांतीपूर्ण सह-अस्तित्वाने रहावे. सदैव या निराकार प्रभुशी जोडून राहावे. सर्वांना उपयोगी पडावे.

जिथं विश्वास, भक्ती आणि समर्पित भाव हे भक्तीचे अलंकार आहेत तिथे भक्तीचाच एक महत्त्वपूर्ण पैलू शहाणपण, समजदारी हादेखील आहे. संतांना हे ठाऊक असतं, की आपण आपल्या जीवनात कोणत्या गोष्टी अंगीकारायच्या आहेत आणि कोणत्या गोष्टी सोडून द्यायच्या आहेत. दररोज एक नवीन गोष्ट

शिकणे म्हणजे ज्ञान. दररोज नवीन गोष्ट शिकण्यात जसं शहाणपण असतं, तसं रोज काहीतरी (अनावश्यक ते) सोडून देण्यातही शहाणपण असतं.

संत जिथं जातात तिथं भक्तीचा सुगंध, भक्तीची शिकवण जगाला देत असतात. बाबाजी म्हणत - काही लोक सुंदर जागा शोधतात; पण काही मात्र विरळेच असतात जे त्याच जागेला सुंदर बनवतात.

लहानपणी एक गोष्ट ऐकली होती, की एक व्यक्ती विचार करते, उद्या सकाळी माझा शेजारी उठला, की त्याच्या अंगावर घाण-कचरा टाकायचा. अर्थात हे करण्यासाठी ती व्यक्ती कचरा गोळा करत बसली. तो कचरा रात्रभर जवळ ठेवला. त्या दुर्गंधीमध्ये रात्र घालवली. कधी एकदा शेजारी घरातून बाहेर पडतो आणि मी त्याच्या अंगावर कचरा टाकतो असे त्याला झाले होते. त्याचवेळी शेजारची व्यक्तीदेखील हाच विचार करत होती, की कधी माझा शेजारी सकाळी उठून बाहेर पडतो आणि मी त्याच्या अंगावर फुलांचा वर्षाव करतो. त्यासाठी दिवसभर तो फुलं गोळा करत राहतो. संपूर्ण रात्र फुलांच्या सुगंधातच घालवतो.

सांगण्याचा भावार्थ हाच आहे, की जे आपण दुसऱ्याला देऊ इच्छितो ते आधी आपल्या वाट्याला येतं. कचरा टाकणाऱ्याच्या वाट्याला दुर्गंध आला तर फुलं देणाऱ्याच्या वाट्याला सुगंधच सुगंध आला. म्हणूनच महात्मा प्रार्थना करतात

तेरी तरह ही दर्द हो मेरे भी सिने में जमाने का।
तेरे जैसी नियत हो तेरे जैसा किरदार बने।

❑❑❑

## ईश्वराने निर्माण केलेल्या माणसावर प्रेम करायचे आहे

माणसाने माणसावर प्रेम करणे म्हणजेच परमेश्वरावर प्रेम करणे असे मानले जाते. बहुतेक करुन असे म्हटले जाते, की अमुक एक व्यक्ती फारच प्रभूप्रेमी आहे. वास्तविक प्रभूप्रेमीचा असा अर्थ होत नाही, की कोण किती पाठांतर करतो, कोण किती यात्रा करतो, कोण सतत माळा जपतो, प्रभूचा जयजयकार करतो. अल्ला, गॉड, राम या सर्वांच्या नावाचा जयघोष अशा कोणत्या जरी बाह्यात्कारी गोष्टी केल्या तरी ती खऱ्या भक्ताची ओळख होऊ शकत नाही. तर प्रभूप्रेमी त्यालाच म्हटलं जातं, की जो माणसाशी प्रेम करीत असेल. प्रेम ते सुध्दा असे नाही, की हा कोणत्या जातीचा आहे, कोणत्या सांप्रदायाचा आहे, हा पगडीवाला आहे की टोपीवाला आहे. हा कोणत्या धर्माशी संबंधीत आहे. अशा दृष्टीने केलेले प्रेम हे खरे प्रेम होऊ शकत नाही. म्हणजेच प्रेम हे केवळ प्रेम असते. त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसतो. म्हणून संत कबीरजी म्हणाले, की ना कोई बैरी नाही बेगाना, सगल संग हमको बनी आई. म्हणजेच प्रेमात आपला-परका हा भेदच उरत नाही. सर्व विश्वच आपले आहे म्हणून सर्वांच्या भल्याची कामना आणि सर्वांचेच भले करण्याचा प्रयास आणि त्यासाठी योगदान देण्याची गरज आहे.

- निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज



कथा

# कोल्ह्याची फजिती


एका मोठ्या जंगलात एक कोल्हा राहत होता. तो नेहमी लहान-सान प्राण्यांची शिकार करुन आपली उपजिवीका करत असे. कोल्हा हा नावाप्रमाणेच लबाड असल्यामुळे लबाडी करुनच शिकार करायचा. त्या जंगलात वाघ, सिंह, तरस, अस्वल यांसारखे हिंस्त्र पशू सुध्दा होते. कधी कधी कोल्हा त्यांनी मारलेल्या शिकारीचा फायदा घेत हळूच लपून छपून लचके तोडून पळवायचा. असेच तो एकदा भक्ष्य शोधण्यासाठी फिरता फिरता एका तळ्याजवळ आला. नेमके त्याचवेळी बदके तळ्यातून पोहून बाहेर आली होती. आपले पंख फडफडवून ती उन्हाचा लाभ घेत होती. बदकांना तळ्याच्या बाहेर पाहून कोल्ह्याला फार आनंद झाला. तो

मनातल्या मनात म्हणत होता, की आपण आता या सर्व बदकांना मारुन घेऊन जायचे म्हणजे काही दिवस तरी आपल्याला वणवण फिरावे लागणार नाही.

असा बेत करुन तो बदकांच्या कळपात शिरला. त्यांच्याशी तो गप्पा मारु लागला. गप्पा मारता मारता त्याला वाटले, आता ही बदकं कुठे जाणार ? आपणच त्यांचा सोक्षमोक्ष करणार ! कोल्हा असे आपल्या मनात मांडे तयार करत असताना तो एका वृध्द बदकाला म्हणाला, आता तुम्ही सर्वच मरणार आहात तेव्हा तुमची अखेरची इच्छा काय आहे ते सांगा ! तेव्हा तो वृध्द बदक म्हणाला, आम्हाला आता फक्त देवाची प्रार्थना करायची आहे. असे म्हणून त्याने मोठ्याने ओरडायला सुरुवात केली. लगेच दुसऱ्याने, तिसऱ्याने असे एकंदर सर्वांनीच जोरात सूर धरत ओरडायला सुरुवात केली.

त्याच तळ्याच्या अवती भोवती वानरांचा कळप राहत होता. त्यातल्या काही वानरांना हे ओरडणे ऐकू आले. वानर समजून गेले, की आज बदकांवर काहीतरी संकट आले असावे. एक वानर धावत येऊन तळ्याजवळ पोचला. पाहतात तर कोल्हा बदकांच्या थव्यामध्ये लूडबूड करत आहे. वानरांनी मोठा आवाज करताच कोल्हा पळू लागला. वानरांनी त्याच्या पाठी धावत जाऊन त्याला तिथून दूर पळवून लावले.

**तात्पर्य :** जंगलातील मुके प्राणीसुध्दा प्रसंगी एकमेकांच्या मदतीला धावून येतात. तसे, आपणसुध्दा एखाद्यावर अन्याय होत असेल तर त्याला मदत करावी.



# करु नका विश्राम

रोज सकाळी नियमित येतो
अंधाराला पळवून लावतो

कोवळ्या उन्हाने न्हाऊ घालतो
सकळांची मनं प्रसन्न करतो

कधी न थांबता सतत चालतो
साऱ्या सृष्टीस जीवन देतो

त्याच्यासोबत जो चालतो
तो सदैव प्रगती करतो

हा रवी मित्र विश्वाचा
नित्य करीतो काम

बना तसे तेजस्वी
करु नका विश्राम


- प्रा. देवबा शिवाजी पाटील
बुलढाणा



चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा

# आजोबा







एकदा तो कुठेतरी चालला होता. त्याला वाटेत काळ्या जांभळांनी लगडलेली झाडं दिसली. काळीभोर टपोरी जांभळं पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले.
त्या झाडावर पोपटांचा थवा आनंदाने जांभळं खाताना त्याला दिसला.
ससा त्यांना म्हणाला, माझ्या प्रिय नातवांनो, थोडीशी जांभळं मलादेखील द्या.
त्या पोपटांमध्ये मिठू नावाचा एक पोपट फारच खोडकर होता.
तो म्हणाला, आजोबा, तुम्ही गरम जांभळं खाणार की थंड ?


म्हातारा ससा हैराण झाला. तो म्हणाला, वेड्यांनो, जांभळं कधी थंड किंवा गरम असतात का? माझी चेष्टा करु नका. चला, माझ्यासाठी थोडी जांभळं तोडून खाली टाका.
अहो आजोबा, तुम्ही विद्वान असूनही तुम्हाला एवढंदेखील ठाऊक नाही की, जांभळं थंड आणि गरम असतात. आधी तुम्ही सांगा तुम्हाला कुठली जांभळं हवीत? त्याशिवाय आम्ही तुम्हाला कशी देणार?
म्हातारा ससा विद्वान असूनही ही गोष्ट समजू शकला नाही, की खरंच जांभळं गरमही असतात? त्याचं रहस्य काय आहे हे जाणून घेण्यासाठी तो म्हणाला -
बेटा, तू मला गरम जांभळं दे. थंड जांभळं मी खूप खाल्लेली आहेत.


छोट्या मिठूने मग एक फांदी जोराने हलवली. त्याबरोबर खूपशी जांभळं खाली धुळीत पडली. म्हातारा ससा ती धुळीत पडलेली जांभळं फुंकून फुंकून खाऊ लागला.
ससा म्हणाला, बेटा, ही तर थंड जांभळं आहेत.
मग तुम्ही ती फुंकून फुंकून का खात आहात ? अशा तऱ्हेने तर गरम पदार्थच आपण खातो.
छोट्या मिठूच्या बोलण्यातली खुबी सशाच्या लक्षात आली. तो शर्मिंदा झाला आणि त्याचा अभिमान गळून पडला.

# पद्मशीला तिरपुडे

ही गोष्ट म्हटली तर अगदी सोपी आणि म्हटली तर खूप काही सांगून जाणारी. एका मजूरी करणाऱ्या माणसाचीव त्याच्या पत्नीची. गावकुसाबाहेरच्या पालावर राहणाऱ्या या कुटुंबाने जगासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. दोन लहानगी लेकरं घेऊन संसाराचा गाडा ओढताना या पती-पत्नीने यातून बाहेर पडण्याची जी असामान्य धडपड केली तिला आज यश आले आहे. त्या मजूराच्या पत्नीने पदवी परीक्षा उत्तीर्ण तर केलीच पण त्यानंतर तिने चक्क पोलीस दलात अधिकारी पदाची नोकरी मिळवली आहे. ही कहाणी आहे पद्मशीला तिरपुडे या सामान्यांतील असामान्य महिलेची. महाराष्ट्र पोलीस अकादमीत नुकत्याच झालेल्या उपनिरीक्षकांच्या तुकडीचा दीक्षान्त सोहळा या यशस्विनीसाठी आयुष्यातील परमोच्च आनंदाचा-अभिमानाचा ठेवा ठरलाच तसाच तो अनेकांना प्रेरणा देणारा क्षण होता. तो अनुभवण्यासाठी तिने प्रचंड संघर्ष केला. त्याचीच ही सुखद परिणीती होती. राज्याच्या पोलीस दलास आजवर उपनिरीक्षक दर्जाचे २४ हजार अधिकारी देणाऱ्या महाराष्ट्र पोलीस अकादमीची यंदाची १०८ वी तुकडी अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण ठरली. या तुकडीने सर्वाधिक, १५४४ फौजदार दिले आणि त्यात १२० महिला पोलीस अधिकारी आहेत. त्यापैकीच एक असलेल्या पद्मशीला यांचा दहा वर्षातील प्रवास अनेकांना प्रेरणादायी आहे.

मूळच्या भंडारा जिल्ह्यातील असलेल्या पद्मशीला रमेश तिरपुडे यांचा त्याच जिल्ह्यातील वाकेश्वरजवळच्या पहेला गावातील पवन तुकाराम खोब्रागडे यांच्याशी दहा वर्षांपूर्वी प्रेमविवाह झाला होता. त्या सांगतात, पोलीस अधिकारी व्हायचं स्वप्न पूर्ण झालं, याचा आनंद आहे. पण त्याचं सगळं श्रेय पतीलाच आहे. त्यांनी खूप सोसलंय. हमाली केली, समोसे विकले, मजुरी केली. त्यांनी घेतलेले सगळे कष्ट आज कामाला आले. पद्मशीला तिरपुडे (पोलीस उपनिरीक्षक) सांगतात, आयुष्यात एक दिवस असा आला, की घरात अन्नाचा दाणाही नव्हता. उसने आणलेले पन्नास रुपये बाजारात हरवले. खूप वाईट वाटले. खूप रडलो तसेच उपाशी झोपलो. पण त्या दिवशीच निश्चय केला, की मोठं अधिकारी व्हायचं. पद्मशीला शिकल्या अन् मोठी अधिकारी व्हायचं या स्वप्नासाठी त्यांनी खूप कष्ट केलं. घरची परिस्थिती फारच हलाखीची होती. पद्मशीला यांचे पती पेव्हर ब्लॉकचे मजुरीचे काम करुन घर चालवत होते. नाशिकच्या गोदावरीच्या काठावरील एका पालामध्ये दोन लहानग्यांसह त्यांनी संसार थाटला होता. पण त्यांच्या मनात यातून बाहेर पडण्याची, भरारी घेण्याची जिद्द होती, त्यांना त्यांच्या पतीची साथ होती. त्यामुळे अनेक आव्हानांशी लढत त्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर एमपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण होत त्यांची निवड राज्य पोलीस दलात आज उपनिरीक्षक पदावर झाली आहे. जीवनात वाईट स्थिती आली म्हणून तिथेच न थांबता त्यांनी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर चक्क पोलीस फौजदार होऊन अनेक जणींसमोर आदर्श तर ठेवलाच आहे पण स्वत:च्या जीवनाला असामान्य वळण देण्याची किमया साधली आहे. त्यांच्या या कर्तृत्वाला आमचा सलाम!!!

❑❑❑

# गौताळा अभयारण्य

गौताळा अभयारण्यापासून औरंगाबाद हे सर्वात जवळचे विमानतळ आहे. औरंगाबाद आणि जळगाव ही सर्वात जवळची रेल्वे स्थानके आहेत. त्याचप्रमाणे हे अभयारण्य कन्नड, औरंगाबाद आणि चाळीसगावशी रस्तामार्गे जोडले असल्याने या शहरांवरुनही अभयारण्याला पोचता येते. गौताळा अभयारण्याने प्राचीन वारसा जपला आहे. प्रसिध्द गणितज्ज्ञ भास्कराचार्य यांची कुटी, पुरातन मंदिर, लेणी, केदारकुंड, महादेव मंदिर, सीता खोरे आदी विविध प्राचीन स्थळांनी पर्यटकांना भुरळ घातली आहे. त्यामुळे ही ठिकाणे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. पर्यटकांना नेहमीच्या अभयारण्यातील पशुपक्षी व वनस्पतींबरोबरच ही प्राचीन ठिकाणेही पाहता येतील. गौताळा अभयारण्य अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक घटनांशी संबंधित आहे. अभयारण्यातील पाटणा देवीचे मंदिर प्रसिध्द असून विशेषत: नवरात्रीत हजारो भाविक देवीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. सध्या हे मंदिर पुरातत्व खात्याच्या नियंत्रणाखाली आहे. येथील वन विभागाच्या विश्रांतीगृहात विद्यार्थ्यांना निवासाची सोय उपलब्ध करुन दिली आहे. औरंगाबाद-कन्नड रस्त्यावर सातमळा रांगेत बौध्द परंपरेचा वारसा सांगणारी पितळाखोर लेणी असून, ती लेणी खडकांमध्ये कोरलेली भारतातील सर्वात प्राचीन लेणी समजली जातात. ही लेणी उंचावर असल्याने पायऱ्या चढून त्यांच्यापर्यंत पोचावे लागते. अभयारण्याला भेट देणारे पर्यटक या लेण्यांनाही आवर्जुन भेट देतात. गौताळा अभयारण्य वन्यप्रेमीबरोबरच छायाचित्रकार व इतरांच्या दृष्टीनेही आदर्श आहे. या सर्वांबरोबरच शहरी जीवनातून काही काळ शांततेत घालविण्याची इच्छा असणाऱ्यांसाठीही हे अभयारण्य उपयुक्त आहे.

मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील हे अभयारण्य १९८६ मध्ये अस्तित्वात आले. औरंगाबाद शहरापासून ते ७२ किलोमीटर अंतरावर असून पश्चिम घाटातील अजंठा आणि सातमळा पर्वतरांगेत वसले आहे. गौताळा या गावाच्या नावावरुन अभयारण्याला हे नाव दिले आहे. अभयारण्यातील केदारकुंड, सीता खोरे पाहण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात. अभयारण्यात प्राण्यांच्या ५४ आणि पक्ष्यांच्या २३० प्रजाती आढळतात. विविध वनस्पतींबरोबरच पशुपक्ष्यांनी समृध्द असलेल्या मराठवाड्यातील सर्वात मोठ्या अभयारण्याला एकदा तरी भेट नक्कीच द्यावी. हे अभयारण्य प्राचीन वारसा जपणारे आहे. जानेवारीपासून मार्चपर्यंत अभयारण्याला भेट देण्याचा काळ उत्तम आहे.



# चावंड किल्ला

जुन्नर तालुक्यामध्ये नाणेघाटाचे पहारेकरी म्हणून नावलौकिक मिळवलेले किल्ले म्हणजे जीवधन, चावंड, हडसर आणि शिवनेरी. यापैकी चावंड जुन्नर शहरापासून तासाभराच्या प्रवासावर असलेल्या आपटाळे गावानजीक आहे. गडाच्या पायथ्याशी चावंड गाव वसलेले आहे. नाणेघाटापासून जुन्नरच्या दिशेने १५ कि.मी. च्या आसपास चावंड वसलेला आहे. चावंड गावात आणि आजूबाजूच्या गावांमध्ये महादेव कोळ्यांची वस्ती आहे.

## इतिहास :

सन १४८५ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना करणाऱ्या मलिक अहमदला पुणे प्रांतातले जे किल्ले मिळाले त्यामध्ये चावंडचे नाव आहे. बहामनी साम्राज्याचे जे तुकडे झाले त्यात त्याला उत्तर कोकण व पुणे प्रांत मिळाले. दुसरा बुऱ्हाण निजामशहा (इ.स.१५९०-१५९४) हा सातवा निजाम, याचा नातू बहादूरशहा १५९४ साली चावंडला कैदेत होता. १६२६ मध्ये निजामशाहीचा आदिलशाह आणि मोगलांपासून बचाव करण्यासाठी शहाजीराजांनी जो तह केला, त्यानुसार चावंड मोगलांना मिळाला.

## गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

दरवाजातून आत जाताच दहा पायऱ्या चढून गेल्यावर दोन वाटा लागतात. वरची उजवीकडची वाट उद्ध्वस्त अवशेषांकडे घेऊन जाते तर डावीकडे तटबंदीच्या बाजूने जाणारी वाट आहे. उजव्या बाजूस कातळात कोरलेल्या १५-२० पायऱ्या चढून गेल्यावर काही वास्तू नजरेत येतात. एका वास्तूचा चौथरा अजून शिल्लक आहे तेथेच मोठे गोल उखळ आहे. मात्र त्यास खालच्या बाजूला एक छिद्र आहे. बाजूलाच २ संलग्न अशी टाकी आहेत. येथून उत्तरेस थोडे पुढे गेलो, की एक खचत चाललेली वास्तू नजरेस पडते. हिच्या बांधकामावरुन असे प्रतीत होते, की हे एक मंदिर असावे. पण बरीच खचल्यामुळे जास्त काही अंदाज बांधता येत नाही. येथून आजूबाजूला साधारण ३०० मी.च्या परिसरात १०-१५ उद्ध्वस्त बांधकामे तशीच ७-८ टाकी आढळून येतात. गडाच्या वायव्य भागात आपल्याला एकमेकांना

लागून अशी सात टाकी आहेत.

आजूबाजूला जुन्या मंदिरांचे अवशेष विखुरलेले दिसतात. एक तुटलेली मूर्ती आढळते, ती एखाद्या ऋषीचे प्रतीक असावी. तसेच एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे या चामुंडा देवीच्या मंदिरासमोर आढळणारा नंदी. जुन्या अवशेषांमध्येही नंदीची मूर्ती आढळते. याचा अर्थ हा होतो, की जवळच कुठेतरी शिवलिंग असावे आणि काळाच्या ओघात ते हरवले असावे. ग्रामस्थांनी श्रमदानाने जसे नवीन देऊळ बांधले तशी शेजारी असलेली दीपमाळही बांधण्याचा प्रयत्न केला आहे. ही दीपमाळ असे सुचवते की इथे एक शिवमंदिर असावे. एकंदरित पाहता गडाचा घेरा विस्तीर्ण आहे. साधारण ५-६ कि.मी.चा व्यास असावा.


### गडावर जाण्याच्या वाटा

गडमाथा गाठण्यासाठी गडाच्या पश्चिमेकडून वाट आहे. चावंड वाडीतील आश्रमशाळेपासून गड चढण्यास चांगली मळलेली पायवाट आहे. या वाटेने साधारण अर्धा तास चढल्यानंतर आपण खडकात खोदलेल्या पायऱ्यांच्या समांतर रेषेत चालतो. पायऱ्या चढून गेल्यावर आपणास एक मन खिन्न करणारी गोष्ट जाणवते. पूर्वी कोणा अनामिकाने या पायऱ्या चढण्यासाठी आधार म्हणून एका छोट्या तोफेची नळी जमिनीत पुरली आहे.

### राहण्याची व्यवस्था

गडावरील कोठारांमध्ये १५ ते २० जण राहू शकतात, तर चामुंडा मातेच्या मंदिरात २ जण. इथे उंदिर त्रास देऊ शकतात. चावंडवाडीत राहण्याची उत्तम सोय होते. गडावर जेवणाची सोय नाही. मात्र चावंड गावात जेवणाची सोय होऊ शकते. गडावर अनेक टाकी आहेत ज्यामध्ये बारामाही पिण्याचे पाणी आहे. गडावर जाण्यासाठी चावंड गावापासून १ तास लागतो.

❑❑❑



# कच्च्या आहारात दडलंय आरोग्याचं रहस्य

महाराष्ट्राला स्वत:ची अशी एक खाद्यासंस्कृती आहे. अस्सल महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांबरोबरच अन्य भारतीय खाद्यपदार्थदेखील लोक चवीने खातात. म्हणूनच अगदी महाराष्ट्रात मकेक्की रोटी मिळते, तर पंजाबात झुणका भाकर मिळेल असा बोर्ड दिसतो. अगदी सिमल्याला गेलात किंवा कन्याकुमारीला गेलात तर तेथेही मुंबई भेळ ही पाटी हमखास दिसते. असे जरी असले, तरी आरोग्य जपणाऱ्या आणि खाण्यापिण्यावर प्रचंड कंट्रोल ठेवणाऱ्यांसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. विशेषत: उत्तम आरोग्य हे उत्तम आहाराशी जोडलं गेलं आहे. म्हणूनच आजच्या धावपळीच्या जीवनात बदलत्या जीवनशैलीशी एकरुप होताना पौष्टिक पदार्थ घेणे आवश्यक झाले आहे.

जेवणात सॅलेडचे म्हणजे कोशिंबीरीचे फार महत्त्व आहे. ज्या भाज्या कच्च्या खाल्ल्या जाऊ शकतात त्यांचा सॅलडमध्ये वापर करता येतो. जेवणात सॅलडचे खास स्थान असण्याचे मुख्य कारण म्हणजे यात सर्व जीवनसत्त्वे, पौष्टिक तत्त्वे, लोह, गंधक, फॉस्फरस, पिष्टमय पदार्थ, चरबी, प्रोटीन यांचा समावेश असतो. मुळा, गाजर, टोमॅटो, कोबी, कांदा, लिंबू, आले, बीट इ. भाज्या कच्च्या खाल्ल्यामुळे अधिक जीवनसत्त्वे मिळतात. यामुळे पचनक्रिया सुधारुन जेवण लवकर पचते.

मुळ्यामध्ये जीवनसत्त्व ब, क आणि गाजरात जीवनसत्त्व अ, क, लोह आणि कांद्यात जीवनसत्त्व क, ब, गंधक, फॉस्फरस पुरेशा प्रमाणात असतात. कोबीमध्ये तर जीवनसत्त्व अ, ब, क याबरोबरच प्रोटीन, चरबी इ. असतात. लिंबामुळे भरपूर प्रमाणात जीवनसत्त्व क मिळू शकते. बीट, मुळा, सॅलड यांची पाने सॅलडच्या रुपात खाल्ल्याने सगळ्यात जास्त जीवनसत्त्वे मिळतात.

म्हातारपणात कच्च्या भाज्या खाणे ही एक समस्या असते. यासाठी सॅलड शक्य तितके बारीक बनवावे. मुळा, गाजर, बीट हे किसावे. टोमॅटोचा रस काढावा म्हणजे वयस्कर लोकांना खाता येईल. लहान मुले, तरुण व्यक्ती, वृध्द व्यक्ती, सर्वांसाठी सॅलडचा जेवणात वापर करणे गुणकारी आहे; कारण सॅलड स्वत:च वैद्यासारखे आहे. दृष्टी सुधारण्यासाठी, पचनाक्रिया नीट राखण्यासाठी, पोटाच्या विविध विकारांसाठी सॅलड औषध आहे. शिवाय विद्यार्थ्यांनी रोज जेवणाबरोबर सॅलड खाल्ले तर शरीर सुदृढ होते.



❒❒❒

# आसन : उष्ट्रासन

हे आसन वज्रासनाच्या वर्गातील आहे. वज्रासन केल्यानंतरच हे आसन करावे. उष्ट्र म्हणजे उंट. या आसन प्रकारात शरीराच्या सर्व अंगांना उंटासारखा वाकडा आकार देण्यात येतो म्हणून या आसन प्रकारास उष्ट्रासन असे म्हटले जाते.

**कृती :-** वज्रासनाप्रमाणे गुडघ्यावर बसा. दोन गुडघे व पायांच्या चवड्याकडे साधारण १५ सें.मी. इतके अंतर ठेवा. नंतर फुफ्फुसात श्वास रोखून ठेवा. आता उजव्या हाताने उजव्या पायाची टाच व डाव्या हाताने डाव्या पायाची टाच घट्ट पकडा. चित्रात दाखविल्याप्रमाणे हात ताठ ठेवा आणि मान मागील बाजूस झुकवा. आता स्वाभाविक श्वासोच्छवास चालू ठेवा. ही आसनस्थिती सहा ते आठ सेकंदांपर्यंत ठेवा. हे आसन दररोज दोन ते तीन वेळा करु शकता.



**फायदे :**

❒ या आसनामुळे श्वसनतंत्र कार्यक्षम बनते, त्यामुळे दम्याच्या रुग्णांसाठी हे आसन अत्यंत फायदेशीर आहे.

❒ जेव्हा रक्तात अशुध्दी निर्माण झाली असेल किंवा शरीरातील धातूंमध्ये (रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि रेत) विकृती निर्माण झाली असेल तेव्हा शरीर दुर्बल व अशक्त होते. अशा वेळेस हे आसन अत्यंत फायदेशीर आहे.

❒ वातजन्य, कफजन्य व पित्तजन्य रोगांपासून मुक्त राहण्यासाठी हे आसन उपयुक्त आहे.

❒ या आसनाच्या नित्य सरावाने भगंदर रोगापासून उत्पन्न झालेले सर्व प्रकारचे विकार तसेच धुपणी (स्त्रियांना वारंवार त्रास देणारा एक रोग) व मधुमेह यांसारख्या रोगांवर हे आसन अत्यंत उत्तमरित्या प्रभावित आहे.

❒❒❒

# वाढदिवसाच्या


शुभ्रा बाणे


सिदक पवार



सई पवार


देवांश पायगुडे


सानवी मोकाशी


मनस्वी केळसकर



हर्षदा आवरे


भक्ती इंगळे


ओम म्हात्रे


समर्थ शेंडे


स्वरा


स्मृती तोरणे


वंश सावर्डेकर


अर्णव कदम



समिप पाटील


श्रेयल पवार

# हार्दिक शुभेच्छा




प्रसाद शिंदे



श्रुती शिंदे



नवदिश बिराडी




प्रिया सुतार



अथर्व पाटील



अंकुर शिंदे



अभिनिती जाधव



तनिष्का विटेकर



साहिल दसोरे



अथर्व जोशी



समृध्दी साळुंखे



स्वराज मोरे



निशांत विठ्ठलेकर



प्रार्थना बनगर



अवनीश ढुगे



तनिष्ठ

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न : उन्हाळ्यात मातीच्या माठातील पाणी थंड का राहते ?

उत्तर : मातीचे भांडे सच्छिद्र असते. त्यात पाणी भरले असता ते झिरपून माठाच्या बाहेरच्या पृष्ठभागावर पसरते. हे पसरलेले पाणी हवेमुळे बाष्पीभवन होऊन हवेत मिसळते. बाष्पीभवनासाठी लागणारी उष्णता माठातील पाण्यातून घेतली जाते. पुन्हा माठातील पाणी झिरपून माठावर पसरते. पुन्हा त्याचे बाष्पीभवन होते. बाष्पीभवनासाठी लागणारी उष्णता पुन्हा माठातील पाण्यातून घेतली जाते. हीच क्रिया वारंवार होत असल्याने माठातील पाणी थंड होत जाते.

प्रश्न : एखाद्या तारेतून विद्युतधारा जात असताना ती तार का तापते ?

उत्तर : तारेतून इलेक्ट्रॉनचा प्रवाह वाहणे म्हणजेच विद्युतधारा वाहणे हे होय. तारेतून विद्युतधारा वाहत असताना या गतिमान इलेक्ट्रॉनचा तारेतील कंपायमान अवस्थेत असलेल्या अणूवर व आयनावर सतत आघात होतो. त्यामुळे इलेक्ट्रॉनमधील काही गतीज ऊर्जा तारेतील अणूंना व आयनांना मिळून त्याचा आयाम वाढतो व ती तार तापून गरम होते.

प्रश्न : एल.पी.जी. गॅस म्हणजे काय ?

उत्तर : एल.पी.जी. म्हणजे लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस किंवा द्रवरुप पेट्रोलियम वायू होय. यात मुख्यत: ब्युटेन व आयसो ब्युटेन हे वायुरुप हायड्रोकार्बन असतात. नॅचरल गॅस थंड करुन त्याच्या भागश: उर्ध्वपातनाने किंवा पेट्रोलियमच्या भागश: उर्ध्वपातनाने एल.पी.जी. मिळतो. हा वायू उच्च दाबाखाली द्रवरुप स्थितीत लोखंडी टाक्यातून घरगुती वापरासाठी पुरवितात. टाकीची झडप उघडली म्हणजे दाब कमी झाल्यामुळे हा वायू वायुस्थितीत बाहेर पडतो.

प्रश्न : ओझोनचा थर कसा असतो ?

उत्तर : पृथ्वीच्या पृष्ठभागापासून अंदाजे १६-२३ कि.मी. उंचीवर ओझोन या ऑक्सिजनच्या अपरुपाचा बनलेला हवेचा थर आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १६ कि.मी. उंचीच्या वर सूर्याचे किरण हवेतील ऑक्सिजनचे रुपांतर ओझोनमध्ये करतात. यामुळे या उंचीवर सुमारे २३ कि.मी. उंचीपर्यंत हवेतील ओझोनचे प्रमाण वाढत जाते. या भागात ओझोनचा थर सर्वात जाड असतो. सूर्य किरणांमध्ये मनुष्याला अपायकारक असलेले अतिनील किरण (अल्ट्रा-व्हॉयलेट रेंज) ओझोन वायू शोषूण घेतो. त्यामुळे ते पृथ्वीवर पोचत नाहीत. म्हणून ओझोनचा थर मानवाला उपकारक आहे.



# यशवंतराव चव्हाण

यशवंतरावजी चव्हाण यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी १२ मार्च १९१३ रोजी एका सामान्य मराठा शेतकऱ्याच्या परिवारात झाला. बालपणीच त्यांच्यावरील वडिलांचे कृपाछत्र हरपले त्यामुळे त्यांचे पुढील पालनपोषण आईने व त्यांच्या चुलत्यांनी केले. त्यांच्या मातोश्रींनी त्यांना आत्मनिर्भयता आणि देशभक्ती विषयी बहूमोल अशी शिकवण दिली. ते लहानपणापासूनच भारत स्वतंत्रतेच्या संघर्षाने प्रभावित होते.

कौटुंबिक परिस्थिती प्रतिकूल असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. १९३८ मध्ये ते मुंबई विश्वविद्यालयामधून इतिहास आणि राज्यशास्त्राची परीक्षा देऊन बी.ए. झाले. या वेळात अनेक सामाजिक चळवळीशी ते सक्रिय होते. काँग्रेस पार्टी, जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल आणि केशवराव जेधे यांच्याशी त्यांची खूप जवळीक होती. १९४० मध्ये ते सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १९४१ मध्ये ते एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण झाले.

यशवंतरावजी चव्हाण भारतीय स्वातंत्र्यचळवळीमधील एक सक्रिय कार्यकर्ते होते. १९३० मध्ये महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या असहकार चळवळीमध्ये त्यांनी भाग घेतला होता. त्याबद्दल त्यांना दंडही करण्यात आला होता. २६ जानेवारी १९३२ मध्ये साताऱ्यामध्ये भारतीय ध्वज फडकविल्याबद्दल त्यांना १८ महिने सजाही झाली होती.

१९४२ मध्ये ए.आय.सी.सी.चे ऐतिहासिक मुंबई अधिवेशन झाले. त्यात भारत छोडो हा नारा घोषित करण्यात आला. या अधिवेशनाचे ते प्रतिनिधी होते. या अधिवेशनात भाग घेतला म्हणून त्यांना पुन्हा तुरुंगवास झाला. तुरुगांतून मुक्त झाल्यानंतर १९४६ ला ते दक्षिण साताऱ्याचे मंत्री झाले. त्याच वर्षी त्यांना मुंबईच्या गृहमंत्र्याचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. मोरारजी देसाई मुख्यमंत्री असताना त्यांनी समाजकल्याण मंत्री, वनमंत्री अशी अनेक मंत्रीपदे भूषविली.

महाराष्ट्राचे ते पहिले मुख्यमंत्री होते. महाराष्ट्रामध्ये औद्योगिक तसेच कृषिक्षेत्राचा समान विकास व्हावा हे त्यांचे स्वप्न होते ते त्यांनी पूर्ण केले. त्यांच्या कारकिर्दित लोक तांत्रिक विकेंद्रिकरण तसेच कृषी भूमी सिमांकन यांच्या अधिनियम संबंधित कायदा करण्यात आला. त्यांना साहित्याची फार आवड होती. त्यासाठी त्यांनी मराठी साहित्य मंडळाची स्थापना केली.

असा हा महाराष्ट्राचा महान नायक १९८४ मध्ये काळाच्या पडद्याआड गेला.

# सहनशीलता



आज जगामध्ये सहनशीलतेची कमतरता आहे. लहान-सहान गोष्टींवरुन माणूस हाणामारी करायला तयार होतो. असहनशीलतेमुळेच माणूस निर्दयी बनून राक्षसी कृत्य करण्यास प्रवृत्त होतो.

प्रभूभक्त आध्यात्मिकतेच्या रंगात रंगून गेलेले असतात त्यामुळे त्यांच्यात सहनशीलता विद्यमान असते. ते इतके मजबूत असतात, की त्यांच्याविषयी कोणीही कितीही कठोर बोलले तरी ते सहजतेने सहन करतात. जर प्रत्येक माणूस असाच सहनशीलतेने वागेल, एक दुसऱ्याच्या कामी येईल तर या जगाचे सुंदर असे रुप पहायला मिळेल.

भक्तजनांचे हृदय विशाल असते. कारण त्यांच्या मनाचे नाते या विशाल प्रभू परमात्म्याशी जोडलेले असते. जर या विशाल परमात्म्याची जाणीव असेल तर मनात चांगले विचार येतात, मन शुध्द राहते, मनात विशालता येते, नम्रता येते, दास भावना येते आणि म्हणून मन सदैव आनंदित राहते. जर आपल्या पायातील चपलेमध्ये लहानसा खडा गेला तर तो काढून टाकेपर्यंत आपल्याला चैन पडत नाही, त्रास होते. यासाठी संतजन म्हणतात, की जोपर्यंत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सररुपी खडे आपण मनातून काढून टाकत नाही तोपर्यंत आपल्याला खऱ्या आनंदाचा अनुभव होणार नाही.

जर परमात्म्याची सतत जाणीव राहिली तर आपल्या मुखावाटे कधीही कटूशब्द निघणार नाही, असहनशीलता येणार नाही. गैरव्यवहार होणार नाही. दुसऱ्याबद्दल वाईट भावना येणार नाही.

म्हणून हीच प्रार्थना आहे, की हे प्रभू! ज्यांच्यामुळे तुझे ध्यान होईल, तुझ्यावरचा विश्वास दृढ होईल, अशा संतांचा सहवास लाभू दे.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# शिमगा

गावातील सर्व नागरिकांनी एकत्र यावं; एकोप्याने रहावं, एकमेकांशी प्रेमाने वागावं, एकमेकांना सहाय्य करावं. अशा या सर्व गोष्टींचा विचार करुन पूर्वजांनी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांची परंपरा चालू केली. माणसाला या सर्व गोष्टींची त्यावेळीही आवश्यकता होती आणि आजही आहे; परंतु आज या सणासुदीमागचा इतिहास, त्यामागचा भाव हा अदृश्य झाला आणि राहिली ती फक्त आणि फक्त कृती, परंपरा-रिवाज.

कोकणात अनेक सण-उत्सव सार्वजनिक स्वरुपात साजरे केले जातात; परंतु शिमगा हा उत्सव या सर्व सणांपासून थोडा वेगळा आहे. कोकणात प्रत्येक गावामध्ये हा उत्सव जल्लोषात साजरा केला जातो. होळी पौर्णिमेपासून कमीत कमी दहा दिवस तर जास्तीत जास्त गुढी पाडव्यापर्यंत हा सण साजरा करण्यात येतो.

प्रत्येक गावची एक ग्रामदेवता असते. या ग्रामदेवतेला पालखीमध्ये बसवून ती पालखी ढोल-ताशांच्या गजरात प्रत्येकाच्या घरी नेली जाते. त्या ठिकाणी पारंपारिक वेशभूषा परिधान करुन एक वेगळ्याच चालीमधील पौराणिक गीतं म्हणून त्या गीतांच्या तालावर वेगवेगळ्या प्रकारची नृत्ये केली जातात. ही गीतं बहुधा डफ या चर्मवाद्याच्या ठेक्यावर म्हटली जातात. या सर्व नृत्य करणाऱ्या पुरुषांना 'खेळे' या नावाने संबोधतात. डफाच्या साथीने म्हटलेली ही गाणी फारच गोड वाटतात, ऐकणाऱ्याला देहभान विसरायला लावतात. ढोल-ताशांचं वादनसुध्दा फार उत्कृष्ट असतं. प्रत्येकाच्या अंगणात ग्रामदेवतेची पालखी नाचवली जाते.

एकंदरीत गावातील प्रत्येकाच्या घरी जाऊन हा खेळ केला जातो. त्यामुळे प्रत्येकाशी खेळीमेळीचं वातावरण बनतं. कोणाशीही हेवे-दावे राहत नाहीत. हीच संकल्पना या सणामागे आहे. परंतु लोक त्या दृष्टिकोनाचा विचार करत नाहीत. हे सण फक्त रुढी म्हणूनच करत आहेत. लोकांनी जर याच्या पाठीमागचं रहस्य काय याचा विचार केला असता तर आज सणाला आलेले विकृत स्वरुप दिसले नसते. वैचारिक मतभेद दिसले नसते. वातावरण प्रदूषित झाले नसते. म्हणून गरज आहे ती या परंपरांचा मतितार्थ जाणण्याची. अन्यथा शिमगा हे सणाचे नाव असूनही माणसा-माणसात होणाऱ्या कलहाला शिमगा हे नाव पडले नसते.

❑❑❑



# हसा मुलांनो हसा

गण्या रागारागाने डॉक्टरकडे गेला.
गण्या : डॉक्टर, माझ्या वरच्या दातात किडा होता; मग तुम्ही खालचा दात का काढला ?
डॉक्टर : तो किडा खालच्या दातावर उभा राहून वरचा दात कोरत होता. आता बघू कुठे उभा राहतो तो !

ट्रॅफिक सिग्नल लाल असताना एक जण तोडून निघून गेला. त्याच्या मागोमाग अजून पाच जण सिग्नल तोडून निघाले. ट्रॅफिक हवालदाराने पहिल्या व्यक्तीला सोडून मागच्या पाचही जणांना पकडले. त्यांच्याकडून दंड वसूल केला. तेव्हा बाकीचे पाचही जण हवालदाराला म्हणाले, तुम्ही पहिल्या व्यक्तीला का सोडून दिले ?
हवालदार म्हणाला : तो आमचा माणूस आहे. तो आता पुन्हा सिग्नल तोडणार आणि त्यात तुमच्यासारखे बावळट आमच्या तावडीत सापडणार.

आई (बंड्याला ) : जा रे शेजारच्या ठमाकाकूंकडून चहासाठी आलं घेऊन ये.
बंड्या : (ठमाकाकूंना) ) काकू काकू चहासाठी आलं पाहिजे.
ठमाकाकू : हो हो नक्की येईन हं बाळा !
बंड्या : अॅऽऽऽऽ ?

डॉक्टर : (एका मानसिक रुग्णाला): तुम्हाला मानसिक तणाव आला की तुम्ही काय करता ?
पेशंट : मी देवळात जातो.
डॉक्टर : अरे वा ! ध्यान करता का ?
पेशंट : नाही हो, सगळ्यांच्या चपला मिक्स करतो आणि मग मजा बघतो.

डॉक्टर : काय बंडोबा, चहा लाभदायक आहे की हानिकारक ?
बंडोबा : त्याचं काय आहे, चहा प्यायला मिळाला तर लाभदायक; कुणाला पाजायचा म्हटला तर हानिकारक आहे.

सविता : अगं माझे पती दिवसभर हातात मोबाईल धरुन बसतात, काय करावं कळत नाही ?
सरिता : रात्री ते झोपले की त्यांच्या हातावर मेंहदी काढ.
सविता : त्याने काय होणार आहे ?
सरिता : अगं. चार माणसात वावरताना खिशात हात घालून गप्पं रहावं लागेल त्यांना.

सासू : सूनबाई, आज पुलावाला टूथपेस्टचा वास का येतोय ?
सूनबाई : घरात लवंग, चालचिनी, वेलची आणायला सुट्टे पैसे नव्हते म्हणून मग पतंजली टूथपेस्ट टाकली . त्यात सगळं असतं ना !

शिक्षक : बन्या, सांग पाहू - मी उपाशी आहे या वाक्यात कोणता काळ आहे ?
बन्या : दुष्काळ

चिंगी : (परीक्षेचा पेपर सोडवताना) ए मंगे, पाचवा प्रश्न दाखव ना !
मंगी : का ?.....तुझ्या प्रश्नप्रत्रिकेत छापला नाही का गं झिपरे !

इंग्रजीचे शिक्षक : - गण्या सांग पाहू Shall कधी वापरतात ?
गण्या : थंडीत !

# तेलंगण प्रांती गमन

पुढे समर्थ तीर्थयात्रा करीत तेलंगणा प्रांतात गेले. नंतर ते फिरत फिरत सारंगपुरानजिक इंदूर म्हणून एक गाव आहे, तेथे पोचले. तेथे एक मोठा तलाव असून त्यासभोवती डोंगर व खडी आहे. त्या खडीवर वस्ती केली. एके दिवशी पाहतात तो साठ ब्राह्मण तलावात कमरेइतक्या पाण्यात उभे राहून अनुष्ठान करीत होते. हे पाहून समर्थांनी ब्राह्मणांना नमस्कार करुन विचारले, "आपण कोणते अनुष्ठान करत आहात व का?"

ब्राह्मणांनी सांगितले, "येथे पाऊस नाही. फार दुष्काळ पडला आहे म्हणून तेथील सरकारी अधिकाऱ्यांनी पाऊस पडण्यासाठी आम्हाला अनुष्ठानाला बसविले आहे."

त्यांना समर्थ म्हणाले, "आपण आम्ही सांगू ते कराल तर आज तिसऱ्या प्रहरी पाऊस पडेल."

ब्राह्मण म्हणाले, "काय आज्ञा आहे आपली?"

समर्थ म्हणाले, "आपण सर्व कोरडे वस्त्र नेसून वर या." त्याप्रमाणे सर्व ब्राह्मण वर आल्यावर समर्थांनी तेथील एक दगड घेऊन त्यावर कोळशाने मारुतीची मूर्ती रेखाटली आणि त्यावर एक ओली छाटी टाकून त्याला रुद्राभिषेक करायला सांगितले. अभिषेक होताच त्या दगडावरची छाटी काढली त्यावेळी तो मारुती टाकीने घडवल्याप्रमाणे रेखाटलेला निघाला. नंतर तेथेच एका जाळीमध्ये सर्व साहित्य व भांडीकुंडी आहेत ती घेऊन नेवैद्य, भोजन वगैरे करायला सांगितले. त्याप्रमाणे तेथे सर्वांनी भोजने केली. स्थळशुध्दी झाल्यानंतर पाहतात तो पात्रे वगैरे सामान कोठेच नाही.

नंतर सर्व ब्राह्मणांसह समर्थ झाडाखाली बसले असताना अकस्मात आकाशात एक ढग आला आणि एका घटकेत पावसाला सुरुवात होऊन जिकडे तिकडे गार वातावरण होऊन गेले. परंतु चमत्कार हा, की समर्थ ज्या झाडाखाली बसले होते, त्या झाडाच्या सभोवार मात्र पाऊस पडला नाही. तेवढा भाग कोरडाच्या कोरडा राहिला. हा चमत्कार पाहून सर्व ब्राह्मणांना परम आश्चर्य वाटले. "आपण केवळ साक्षात परमेश्वरच आहात," असे म्हणून ते त्यांच्यापुढे लोटांगण घालू लागले.

तेव्हा समर्थ त्यांना म्हणाले, "आपण वेदोनारायण आहोत, भूदेव आपण, मजकडे काय आहे? सर्वांचा कर्ता श्रीरघुपती आहे. मानवी देहाचे स्तवन कशाला पाहिजे?"

नंतर चार घटकांनी पाऊस थांबला. त्या गावचा अधिकारी यवन होता. त्यानेच ब्राह्मणांना अनुष्ठानास बसविले होते आणि जेव्हा अकस्मात पर्जन्यवृष्टी झाली तेव्हा त्याला ब्राह्मणांच्या सामर्थ्याचे आश्चर्य वाटले. तो मोठ्या समारंभाने साऱ्या ब्राह्मणांना गावात मिरवीत नेण्याकरिता सामोरा आला; परंतु ब्राह्मणांनी "आपल्याकडे काही नाही. सर्व करणी समर्थांची आहे," असे मोकळ्या मनाने सांगितले. तेव्हा त्या अधिकाऱ्याने सर्व ब्राह्मणांसह समर्थांना मोठ्या समारंभाने इंदूरात आणले व बरेच दिवस ठेवून घेऊन तेथे एक मठ स्थापण्याबद्दल विनंती केली. समर्थांनी ही विनंती मान्य करुन कोदंडरामांची मूर्ती स्थापन करुन श्रीमारुतीपाशीही मठ स्थापन केला व तेथे उध्दव गोसावी यांची नेमणूक केली.

समर्थ कधी इंदुरास व कधी खडीवर राहू लागले. त्या मारुतीमागे एक डोंगर असून त्यावरुन पाण्याचा स्त्रोत पडत होता. त्या ठिकाणच्या गुहेत समर्थांची बसायची जागा होती. तेथे दगडावर समर्थांनी एक सवाई कोरली.

❍ क्रमशः

# विद्येची रेषा

आपल्या हातावर अनेक प्रकारच्या रेषा असतात. ज्योतिष शास्त्राच्या मते त्यातील काही रेषा विद्येच्या, धनाच्या किंवा आयुष्याच्या कालमर्यादेच्या असतात. अर्थात अनेकांच्या मते हे थोतांड आहे. त्यामुळे बऱ्याच जणांचा हातावरील या रेषांवर विश्वास नसतो. मात्र या संदर्भात प्रसिध्द संस्कृत व्याकरणकार पाणिनी यांची एक मजेदार कथा सांगितली जाते

पाणिनी तरुण असताना एका आचार्यांकडे शिक्षण घेत होते. पाणिनीसारखेच आचार्यांचे अनेक शिष्य त्यांच्या आश्रमात शिक्षण घेत होते. एकदा आचार्यांनी सर्व शिष्यांना एक गृहपाठ दिला व दुसऱ्या दिवशी त्याची संपूर्ण तयारी करुन यायला सांगितले. अनेक शिष्यांनी गृहपाठ तयार केला होता. काहींची तयारी झाली नव्हती. पाणिनीची सुध्दा तयारी झाली नव्हती.




दुसऱ्या दिवशी सर्व शिष्य एकत्र आल्यावर आचार्यांनी त्यांना गृहपाठाविषयी विचारायला सुरुवात केली. ज्यांचा गृहपाठ तयार नव्हता अशा शिष्यांना त्यांनी छडी मारायला सुरुवात केली. छडी खाल्लेले शिष्य आपापल्या जागी जाऊन बसले. छडी मारत आचार्य पाणिनी जवळ येताच त्याने हात पुढे केला. त्याचा हात पाहताच आचार्य म्हणाले, अरे तुझ्या हातावर तर विद्येची रेषाच नाही. मग तू कसला गृहपाठ करणार ? जा तुझ्या जागेवर जाऊन बस. असे म्हणून आचार्यांनी पाणिनीच्या हातावर छडीही मारली नाही. आचार्यांचे ते म्हणणे ऐकून इतर सर्व शिष्यांना हसू आले. पाणिनीला त्याचा भयंकर अपमान वाटला. त्याने तेथेच प्रतिज्ञा केली, की मी एवढा अभ्यास करेन, की माझ्या हातावर विद्येची रेषा काढीनच. त्यानंतर त्याने संस्कृत भाषेचा परिश्रमपूर्वक अभ्यास करुन व्याकरणकार पाणिनी म्हणून नाव लौकिक मिळवला.

आजच्या काळातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत असं काही घडलं तर आजचे विद्यार्थी मला ते जमणार नाही असे म्हणून प्रयत्नच सोडून देतात. पण प्रयत्न केले तर सफलता नक्कीच मिळते. म्हणतात ना, प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे।

❑❑❑

# किट्टी



चित्रांकन व लेखन : अजय कालडा







वॉव ! किती सुंदर जागा आहे, नाही ?
हो बेटा शिमल्यात अशीच बर्फवृष्टी होत असते.
चला, आपण बर्फाचा पुतळा बनवू या
नाही, नाही आपण बर्फाचे घर बनवू या ज्यात बसून आपण पिझ्झा, बर्गर, थंडपेये खाऊ शकू.
आपण खूप सारा बर्फ एकत्र करु या
किट्टी, आपण सगळे मिळून बर्फाचं घर बनवू या का ?
मी तर पुतळाच बनवणार


अरे ! किट्टी तू इथं बसून काय करतेस ? जा पुतळा बनव !
बघा, मी किती छान पुतळा बनवलाय.
किट्टी, आता बर्फाचं घर बनवायला आम्हाला मदत कर ना !


चला, मी तुम्हाला मदत करते.
अरे, तुमचं घर तर फारच छान तयार झालंय.
चला, आपण सारे मिळून या घरासोबत फोटो काढू या.
cheeze......




समिर


अद्विक


अवनीत


चिराग


वरदान



संतुष्ठ





अगम



सविना



अमृता



अक्षय व गुरुदास



कथा


# गाठोडे कुणाचे

फार पूर्वीची ही गोष्ट आहे. एक शेतकरी आपल्या मुलीकडे जायला निघाला होता. मुलीसाठी व नातवंडासाठी त्याने बऱ्याच वस्तू एका गाठोड्यात बांधून घेतल्या. रस्ते व गाड्यांची व्यवस्था नसल्यामुळे प्रवास पायीच होता. दुपार झाली कडाक्याचे उन म्हणून वाटेत एक आंब्याचे झाड होते त्या झाडाखाली विश्रांती घेण्यासाठी थांबला. गाठोडे उघडले आणि पाणी पिण्यासाठी थोडा गूळ काढला आणि पाणी प्यायला. आपण मुलीसाठी आणि नातवंडांसाठी काहीतरी नेत आहोत या आनंदाने त्याने सर्व गाठोडे उपसले आणि त्याच आनंदात त्याने परत भरुन ठेवले.

त्याच झाडावर एक चोर बसलेला होता. त्याने गाठोड्यातील सर्व वस्तू निरखून पाहिल्या होत्या. त्याला वाटले होते, की हा माणूस इथे झोपेल आणि आपण याचे गाठोडे लंपास करु; परंतु तो माणूस लगेच गाठोडे घेऊन आपल्या मुलीच्या गावी जाऊ लागला. हा चोर सुध्दा त्याच्या पाठोपाठ जाऊ लागला.

थोडे पुढे गेल्यानंतर तो चोर म्हणाला, हे गाठोडे माझे आहे. दोघांचा वादविवाद चालू होता. पाहता-पाहता लोक जमा झाले. दोघांचे कडाक्याचे भांडण

जुंपले. गाठोडे एक आणि त्यासाठी दोघांची झुंबड लागली होती. कोणीतरी समजावण्याचा प्रयत्न केला पण कोणाचेच काही चालेना. शेवटी त्यातील एक माणूस म्हणाला, आपण ही फिर्याद राजाकडे घेऊन जाऊ.



विजयनगरचे राजे कृष्णदेवराय यांच्या दरबारात ही विचित्र तक्रार आली. दोन परदेशी व्यक्ती एक गाठोडे घेऊन आले व ते दोघेही ते गाठोडे माझेच आहे असे सांगू लागले. राजाने दोघांना वेगवेगळे प्रश्न विचारले तेव्हा त्या दोघांनी त्या गाठोड्यातील वस्तूंविषयी अगदी बरोबर माहिती सांगितली. पुन्हा राजाने त्यांना त्या गाठोड्याविषयी बरेच प्रश्न विचारले; पण त्या दोघांची उत्तरं एक सारखीच होती. राजाही त्रासला व दरबारी व इतर मंत्रीही त्रासले. सर्वांना एकच प्रश्न पडला त्या गाठोड्याचा खरा मालक कोण? तक्रारीचा निर्णय काही होईना. शेवटी काही मंत्र्यांनी तेनालीरामचे नाव सुचविले. राजा कृष्णदेवरायला वाटले, की होय तेनालीराम या तक्रारीविषयी योग्य तो निर्णय देईल. तेव्हा तेनालीराम आपल्या आसनावरुन उठला. त्याने त्या गाठोड्याचा वास घेतला. तो पुन्हा पुन्हा त्या दोन्ही परदेशी व्यक्तींना निरखून पाहत त्यांचाही वास घेत राहिला. मग म्हणाला, महाराज या गाठोड्याचा खरा मालक कोण याचा तपास मला लागलेला आहे; परंतु त्याचा निर्णय मी उद्या सांगेन. तिथपर्यंत या दोघांना अतिथीगृहात थांबवावे. राजा या गोष्टीला तयार झाला. दोन्ही परदेशी व्याक्तिंना अतिथीगृहात थांबविले.

दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या तक्रारीवर चर्चा सुरु झाली; परंतु त्या दोन परदेशी व्यक्तींपैकी एक व्यक्ती नाहीशी झालेली होती. राजाने त्याला शोधण्यासाठी सैनिकांना पाठविले. तेव्हा तेनालीराम राजाला म्हणाला, महाराज, ती व्यक्ती आता कोठे बरे सापडेल? ती तर कधीच पळून गेलेली आहे. त्या दोघांचा वास घेण्याचे केवळ नाटक केले होते. मात्र ते खोटे होते. ती व्यक्ती भीतीने घाबरुन गेली होती. तिला वाटले, की आपण ओळखले गेलो.

राजा कृष्णदेवराय हे पाहून खूप हसले. ते गाठोडे त्याच्या खऱ्या मालकाला सोपविण्यात आले. ते पाहून संपूर्ण दरबारात तेनालीरामची खूप स्तुती करण्यात आली. सर्व मंत्र्यांचे चेहरे पाहण्यालायक झाले होते.

❒❒❒

# पुणे

**मुख्यालय :** पुणे

**तालुके :** पुणे शहर, हवेली (पुणे), खेड (राजगुरु नगर) आंबेगाव, जुन्नर, मावळ (वडगाव), मुळशी (पौड), भोर, वेल्हे, पुरंदर (सासवड), शिरुर, दौंड, इंदापूर, बारामती

**सीमा :** उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, आग्नेयेस सोलापूर जिल्हा, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस रायगड जिल्हा, वायव्य दिशेला ठाणे जिल्हा आहे.

**नद्या :** प्रमुख नदी भीमा, नीरा, मुळा, मुठा, घोड, भामा, कऱ्हा, इंद्रायणी, पवना, मांडवी, कुकडी, मीना

**खनिजे :** बांधकामासाठी लागणारा दगड.

**प्रमुख शेतकी उत्पादने :** ज्वारी, भात, ऊस, मका, बाजरी, भुईमूग, डाळी व भाजीपाला

**धरणे :** मुळशी (मुळा) खडकवासला, पानशेत, पिंपळगाव, डिंभे, भाटघर, चासकमान, वरसगाव

**थंड हवेचे ठिकाण :** लोणावळा, खंडाळा

## विशेष माहिती :

पुणे शहर हे विद्येचे माहेरघर, पेशव्यांची राजधानी आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून परिचीत आहे.

भीमाशंकर हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग पुणे जिल्ह्यात आहे.

मोरगाव, ओझर, थेऊर, रांजणगाव व लेण्याद्री ही अष्टविनायकाची स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत. अष्टविनायकाच्या आठ स्थानांपैकी पाच स्थाने पुणे जिल्ह्यात आहेत.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी इंद्रायणी काठी वसलेल्या आळंदी येथे वारकरी संप्रदायाचा पाया घातला तर देहू येथे संत तुकाराम महाराजांनी वास्तव्य करुन या संप्रदायाचा कळस उभारला.


भीमाशंकर मंदीर


ज्योतिबा मंदीर

*हसती दुनिया (मराठी) मासिकाचे मालक हक्क व इतर तपशीलसंबंधी*
*(केंद्र सरकारच्या फॉर्म ४ नियम ८ अन्वये)*

**प्रकाशन स्थळ**

*संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४*

**प्रसिध्दी काळ**

*मार्च २०१८ मासिक (दरमहा)*

**मुद्रकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

*श्री. चंद्रकांत अनंत जाधव*
*संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४*
*भारतीय*

**प्रकाशकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

*श्री. चंद्रकांत अनंत जाधव*
*संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४*
*भारतीय*

**संपादकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

*श्री. राजेंद्र बापू थोरात*
*संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४*
*भारतीय*

**मालकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

*संत निरंकारी मंडळ, माहूल रोड, चेंबूर कॅम्प, मुंबई -७४.*
*भारतीय*

*मी* **श्री. चंद्रकांत अनंत जाधव** *प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.*
*ता. ०१-०३.२०१८*

**चंद्रकांत अ. जाधव**
*प्रकाशक व मुद्रक*

# सामान्य ज्ञान



१) युनेस्कोने आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन कोणत्या दिवशी साजरा करण्याचे जाहीर केले ?

अ) १ फेब्रुवारी ब) ११ फेब्रुवारी क) २१ फेब्रुवारी ड) २७ फेब्रुवारी

२) आदर्श भोसले या पंढरपूरच्या २१ वर्षीय युवकाने अलीकडेच गिनीजबुकात कोणता विक्रम नोंदवला ?

अ) १ मिनिटात १०० जोर बैठका ब) १ मिनिटात ५० दोरीउड्या

क) १ मिनिटात ५० पुलअप्स ड) १ मिनिटात ६२ पुलअप्स

३) समुद्राच्या पोटातील अद्‌भुत दुनिया पाहण्यासाठी स्कुबा डायव्हिंग कोकणात कुठे सुरु करण्यात आले आहे ?

अ) रत्नागिरी ब) मुंबई क) अलिबाग ड) पालघर

४) जगातील सर्वात जास्त भाषा बोलणारा देश कोणता ?

अ) अमेरिका ब) भारत क) चीन ड) रशिया

५) मुंबईचे पहिले महापौर कोण होते ?

अ) शरद पवार ब) वसंतराव नाईक क) जगन्नाथ शंकरशेट ड) फिरोजशहा मेहता

६) वाहनांच्या बॅटरीमध्ये कोणते आम्ल वापरतात ?

अ) सल्फ्युरिक ब) हायड्रोक्लोकि क) सायट्रीक ड) फ्लोरिक

७) तंबाखूचे सेवन केल्याने कोणता दुर्धर आजार होतो ?

अ) कावीळ ब) कॅन्सर क) कॉलरा ड) घटसर्प

८) कोणत्या दिवशी दिवस व रात्र सम-समान असतात ?

अ) १ मार्च ब) ११ मार्च क) २१ मार्च ड) ३१ मार्च

९) ६ मार्च १८६९ पासून कोणत्या सामन्यांची सुरुवात झाली ?

अ) क्रिकेट ब) आशियाई क) ट्वेन्टी-ट्वेन्टी ड) ऑलिम्पिक

१०) रामायणातील कैकेयी ही कोणाची माता होती ?

अ) भरत ब) लक्ष्मण क) भरत व शत्रुघ्न ड) लक्ष्मण व भरत

उत्तरे इतरत्र

# चंचल आणि चतुर

## सूर्यपक्षी



शिंजीर नावानेही ओळखला जाणारा एक सुंदर छोटासा पक्षी. इंग्रजीत या पक्ष्याला सनबर्ड असं म्हणतात. अनेकविध रंगामध्ये आढळणाऱ्या या पक्ष्याच्या त्याच्या रंगानुसार अनेक पोटजाती आढळतात. पंचरंगी सूर्यपक्षी, जांभळा सूर्यपक्षी, किरमिजी पाठीचा सूर्यपक्षी या त्यातील काही प्रजाती. जांभळा, तांबडा, पिवळा, सफेद आणि मोरपंखी अशा विविध रंगाची उधळण असलेला हा चिमुकला पक्षी खूप आकर्षक दिसतो.

जांभळा सूर्यपक्षी अत्यंत आकर्षक दिसतो. जांभळ्या सूर्यपक्ष्यातील नर हा आकर्षक अशा झळाळणाऱ्या, चमकदार, मखमली रंगाचा असतो. मादी मात्र फिकट राखाडी, करड्या हिरवट रंगाची दिसायला अगदी सुमार असते.

हा माणसाच्या सहवासात रमणारा पक्षी असल्याने आपल्या गावाच्या-शहराच्या आसपास आपल्याला दिसतो. भर वस्तीत एखाद्या झाडाच्या फांदीवर किंवा अगदी विजेच्या तारेवर बसून गाणारा सूर्यपक्षी हमखास दिसतो; परंतु अतिशय चंचल आणि सदैव घाईत असलेल्या पक्ष्याचं छायचित्र काढणं कठीणच असतं.

हा छोटासा पक्षी १२-१३ सेंटीमीटर लांबीचा असतो. सतत झ्विक-झ्विक असा बारीक आवाज करत, हा आपलं लक्ष वेधून घेतो. या सूर्यपक्ष्यांना अतिशय लांब, पातळ, वक्राकार चोच असते. या चोचीच्या आत नळीसारखी जीभ असते, ज्यातून ते फुलातला रस सहज पिऊ शकतात. फुलातील रसाबरोबरच बारीक किडे, कीटक, अळी हे यांचं मुख्य खाद्य आहे.

प्रजननाच्या वेळी नर सूर्यपक्ष्याचा निळसर रंग थोडा पिवळसर होऊन निळसर पिसं गळून पडतात. नेहमी जोडीने दिसणारा हा पक्षी घरटंदेखील एकमेकांच्या मदतीनेच बांधतो. गवत, काटक्या, झाडाच्या खोडाची सालं आणि कोळ्याचं जाळं वापरुन पर्सच्या आकाराचं घरटं बांधतात. जे पुढच्या वेळीही परत वापरलं जातं. प्रजनन काळात मादी एका वेळी दोन ते तीन अंडी घालते. दोन आठवड्यांनी अंड्यांतून पिल्लं बाहेर येतात. पिल्लांचं संगोपन व संरक्षण नर व मादी दोघे मिळून करतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# वटवृक्षाची शिकवण

राजू नववीत दुसऱ्यांदा नापास झाला होता. त्यामुळे त्याला सगळ्यांचेच बोलणे ऐकावे लागत होते. मित्रांचे चिडवणे, शिक्षकांचे ओरडणे आणि घरच्यांचे बोलणे या साऱ्या गोष्टींमुळे राजू वैतागून घर सोडून निघाला. रागाच्या भरात निघालेला राजू नेमका कुठे चालला आहे ते त्यालाच कळत नव्हते. चालता चालता घनदाट जंगलात केव्हा पोहचला हे त्याला कळलेच नाही. आता तो पार थकून गेला होता. मनातला रागही शांत झाला होता. त्याने एका घनदाट वटवृक्षाखाली विश्रांती घ्यायचे ठरविले. वटवृक्षाची सावली खूपच शीतल होती. सूर्याचे प्रखर व भीषण ऊन हा वृक्ष कसा सहन करु शकतो याचा विचार करतच

त्याला झोप लागली.

जेव्हा त्याचे डोळे उघडले तेव्हा आकाशात काळे ढग जमा झाले होते. काही वेळातच जोरदार वारे वाहू लागले. राजूने चटकन तिथून निघून जावे असा विचार केला. तोच वटवृक्षाचा आवाज आला. राजू थांब थोड्या वेळातच भयंकर वादळ आणि पाऊस येणार आहे. ते थांबेपर्यंत तू माझ्या आश्रयालाच राहा.

काही वेळातच ढग गडगडू लागले. विजा चमकू लागल्या. पावसासोबतच मोठमोठ्या गाराही पडू लागल्या. त्या भयंकर वादळात अनेक झाडे मुळापासून उन्मूळनही पडली.

पण वटवृक्षाकडे पाहून असे वाटत होते, की तो अशा वादळी पावसाशी झुंजण्यासाठीच तयार झाला आहे. जेव्हा वादळ-पाऊस थांबला तेव्हा वटवृक्ष पूर्वीपेक्षाही आकर्षक आणि तेजस्वी दिसत होता. ते पाहून राजूने विचारले, हे वटवृक्षा तुझ्याकडे अशी कोणती जादूची शक्ती आहे जिच्यापुढे हे भयंकर वादळ आणि पाऊसही तुझे काहीही बिघडवू शकले नाहीत.

वटवृक्ष म्हणाला, राजू, ही जादूची शक्ती नसून दृढतेची शक्ती आहे. कितीही संकटरुपी वादळे आली तरी मी ठामपणे त्यांना सामोरा जातो. तूही राजू, मेहनत कर, पुन्हा अभ्यास कर. इतरांचे बोलणे, टोमणे या गोष्टीनी न डगमगता, अपयशाने न खचता पुन्हा नव्याने, जोमाने भरपूर अभ्यास कर तुला नक्कीच यश मिळेल. राजूला वटवृक्षाकडून यशाचा मंत्र मिळाला. मनात दृढनिश्चय करुन राजू परतीच्या प्रवासाला निघाला.

❑❑❑

कविता : सुलोचना म. हनिमनाळ - इचलकरंजी

# मला वाचवा

आहे म्हणून मी नारी
नका संपवू मज उदरी
दोन्ही घरचा मी लाविते दिवा
आई बाबा मला वाचवा

जगण्याचा हक्क माझा मला ही जगू द्या
मारु नका येण्याआधी ही दुनिया बघू द्या
नका पाडू गर्भ, पाजूनी दवा

मुलांसाठी नवस करता देवासाठी
नावे सुध्दा माझे तुम्ही ठेविता नकोशी
मला चटणी भाकर, दादाला मात्र रवा


धनापुढे माणसाला माणुसकी नाही
हुंडा तेच मागती जे असती कसाई
नाही सुख कोठे माझीया जिवा

संतजना, मुक्ताबाई, सखु मिराबाई
माता सावित्री रमाई थोर त्या जिजाई
इतिहास त्यांचा ध्यानी असावा

नकोशी म्हणे पुढे विपरित घडेल
नारी नाही वाचवली तर दुनिया बुडेल
खरा संदेश घरोघरी पोचवा



# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) ड
३) अ
४) ब
५) ड
६) अ
७) ब
८) क
९) ड
१०) क

## शब्दकोडे १६४

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| म | सु | र | | खा | शा | बा |
| | भा | ज | क | | हू | |
| वि | ष | | म | ध्य | | स |
| | चं | ब | ळ | | चि | त्ता |
| इं | द्र | | | का | | वी |
| ग्र | | मो | ह | न | दा | स |
| ज | न | र | ल | | भो | |
| | ऊ | | का | ज | ळ | |

।। तू ही निरंकार ।।

ना चिंता हो, ना भय हो...
केवळ "सद्गुरू माता सविंदर हरदेवजी महाराज" की जय हो....!



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

